# म्हाडाच्या विविध विभागीय मंडळांतर्फे जाहीर होणा-या सदनिका सोडतीत सहभागी होऊ इच्छिणा-या पत्रकार संवर्गातील अर्जदारांना पत्रकार प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) विविध विभागीय मंडळांतर्फे भविष्यात जाहीर होणा-या सदनिका सोडतीत सहभागी होऊ इच्छिणा-या **पत्रकार संवर्गातील अर्जदारांना** पत्रकार असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी इच्छुक अर्जदाराने म्हाडातर्फे तयार करण्यात आलेले MHADA Housing Lottery Software (MHLS) या नूतन संगणकीय ॲपवर किंवा https://housing.mhada.gov.in या संकेतस्थळावर माहिती सादर केल्यानंतर पत्रकार असल्याचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी प्रणालीमार्फत निर्मित (System generated) पत्र खालील आवश्यक कागदपत्रांसह **मुख्य जनसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**, **कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, म्हाडा मुख्यालय, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१** (**दूरध्वनी क्रमांक -** ०२२ ६६४०५०६६, ०२२ ६६४०५०६७, ०२२ ६६४०५०७७) या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत सादर करावे.

**अर्जासोबत खालील आवश्यक कागदपत्रे सादर करावीत.**

**१)** पत्रकारितेत सलग किमान ५ वर्ष अनुभव असल्याचे प्रमाणपत्र (Experience Certificate) **किंवा** पत्रकार म्हणून काम केलेल्या संस्थेमधील नियुक्ती पत्राची (Appointment Letter) स्वसाक्षांकित छायांकित प्रत.

**२)** माहिती पुस्तिकेत नमूद कालावधीतील **निव्वळ पत्रकारितेतून मिळणा-या उत्पन्नासंदर्भातील कागदपत्रांची स्वसाक्षांकित छायांकित प्रत** (वेतन प्रमाणपत्र, वेतन पावत्या, वेतन बँक खात्यावर जमा झाल्याचे बँक स्टेटमेंट/पासबुक छायांकित प्रत, मुक्त पत्रकारितेकरिता मानधन मिळाल्याचे प्रमाणपत्र / कागदपत्र)

**३)** अर्जदार सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या संबंधित वृत्तपत्राच्या/वृत्तवाहिनीच्या संपादकांचे शिफारस पत्र

**४)** माहिती पुस्तिकेत नमूद कालावधीतील वृत्तपत्रांत स्वत:च्या नावानाशी प्रसिद्ध/प्रकाशित (By line/ Credit line) बातम्या / लेख यांची किमान १० कात्रणे सादर करावे **किंवा**

वृत्तवाहिनीत स्वत:च्या नावानीशी प्रसारित बातम्यांची ध्वनीचित्रफित सीडी/डीव्हीडी/पेन ड्राईव्हमध्ये (१ प्रत) सादर करावी

**५)** सद्यस्थितीत अर्जदार कार्यरत संस्थेने दिलेल्या ओळखपत्राची छायांकित प्रत

**६)** स्वयंघोषणापत्र (Self declaration) (**नमुना प्रत संलग्न**)

**७)** पत्रकार म्हणून सोडतीतील विजेता/विजेती अर्जदार काम करीत असलेले दैनिक/मासिक/साप्ताहिक/नियतकालिक महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी तयार केलेल्या वृत्तपत्रांच्या शासनमान्य यादीवर असल्याचे प्रमाणपत्र / कागदपत्र.

उपरोक्त कागदपत्रे समक्ष अथवा रजिस्टर टपालाने **मुख्य जनसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**, **कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, म्हाडा मुख्यालय, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१** या कार्यालयात सादर केल्यानंतर सादर कागदपत्रांच्या आधारावर निर्णय घेऊन संबंधित अर्जदारांना पत्रकार असल्याचे प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भातील कार्यवाही केली जाईल.

**-----****----**

**स्वयंघोषणापत्र (Self Declaration)**

मी खालील सही करणार श्री./सौ./कु. ____________________ वय ___ वर्ष राहणार (पूर्ण पत्ता) ______________________________________________________________________________________

______________________________________________________________________________________

मुख्य जनसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१ यांच्या नावे प्रस्तुत करतो / करते की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या सदनिका विक्री सोडतीत सहभाग घेण्याकरिता मला पत्रकार असल्याचे प्रमाणपत्र सादर करावयाचे आहे. त्याकरिता सबळ पुरावा म्हणून आवश्यक कागदपत्रे जसे की, **१)** पत्रकारितेत सलग ५ वर्ष अनुभव असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र किंवा पत्रकार म्हणून काम केलेल्या संस्थेतील नियुक्ती पत्राची (Appointment Letter) स्वसाक्षांकीत छायांकित प्रत, **२)** माहिती पुस्तिकेत नमूद कालावधीतील निव्वळ पत्रकारितेतून मिळणाऱ्या उत्पन्नासंदर्भातील कागदपत्रांची स्वसाक्षांकीत छायांकित प्रत (वेतन प्रमाणपत्र, वेतन पावत्या, वेतन बँक खात्यावर जमा झाल्याचे बँक स्टेटमेंट / पासबुकची छायांकित प्रत, मुक्त पत्रकारितेकरिता मानधन मिळाल्याचे प्रमाणपत्र / कागदपत्र, **३)** अर्जदार सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या संबंधित वृत्तपत्राच्या / वृत्तवाहिनीच्या संपादकांचे शिफारस पत्र, **४)** माहिती पुस्तिकेत नमूद कालावधीतील वृत्तपत्रांत स्वतःच्या नावानिशी प्रसिद्ध / प्रकाशित (By line / Credit Line) बातम्या / लेख यांची किमान १० कात्रणे किंवा वृत्तवाहिनीत स्वतःच्या नावानिशी प्रसारित बातम्यांची ध्वनिचित्रफीत सीडी / डीव्हीडीमध्ये (१ प्रत), **५)** सद्यस्थितीत अर्जदार कार्यरत संस्थेने दिलेल्या ओळखपत्राची छायांकित प्रत, **६)** पत्रकार म्हणून सोडतीतील विजेता/ विजेती अर्जदार काम करीत असलेले दैनिक/ मासिक/साप्ताहिक / नियतकालिक महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी तयार केलेल्या वृत्तपत्रांच्या शासनमान्य यादीवर असल्याचे प्रमाणपत्र / कागदपत्र मुख्य जनसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांच्या कार्यालयात सादर करीत असून उपरोक्त नमूद सर्व कागदपत्र / प्रमाणपत्र माझ्या माहितीप्रमाणे खरी व योग्य आहेत.

जर मी सादर केलेल्या कागदपत्रांपैकी कोणतेही कागदपत्र चुकीचे, खोटे, बनावट असल्याचे आढळून आल्यास त्याला पूर्णपणे मी जबाबदार राहील व महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाला (म्हाडा) मला वाटप केलेली सदनिका रद्द करण्याचा व माझ्या विरुद्ध कायदेशीर खटला सुरु करण्याचा अधिकार राहील, या कायदेशीर कार्यवाहीला केवळ मी एकटा/एकटी जबाबदार राहील.

मी याद्वारे नमूद करत आहे की, या योजनेच्या संदर्भात हे स्वयंघोषणापत्र मला आणि माझ्या कायदेशीर वारसांचे उत्तराधिकारी इत्यादींना बंधनकारक असेल.

**विजेत्या अर्जदाराचे पूर्ण नाव व स्वाक्षरी** :- ________________________

**ठिकाण:**

**दिनांक :**